# अहवाल वर्षात संस्थेने राबविलेले उपक्रम

**गुणवंत विद्यार्थी व सभासद सत्कार समारंभ** : संस्थेच्या गुणवान सभासदांचे व त्यांच्या गुणवान मुलांचे कौतुक करणे आम्हाला नेहमीच अभिमानास्पद वाटते. सन २०१६–१७ या शैक्षणिक वर्षात इ. १०वी. , इ. १२वी., पदवी, पदविका व पदव्यूत्तर परिक्षेमध्ये उत्तम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या सभासदांचा व त्यांच्या पाल्यांचा त्याचप्रमाणे सन २०१५–१६ या वर्षात राष्ट्रीय / राज्य / जिल्हास्तरावर कला / क्रिडा / सांस्कृतिक क्षेत्रात विशेष गुणवत्ता अथवा उल्लेखनीय सन्मान मिळविलेल्या सभासदांचा व त्यांच्या पाल्यांचा सत्कार शनिवार दिनांक ०५ मे २०१८ रोजी उच्च न्यायालयाचे सन्माननिय न्यायमूर्ती श्री. पी. डी. नाईक साहेब, श्री. एस. व्ही. कोतवाल साहेब तसेच श्री. अनिरूध्द एम. चांदेकर साहेब प्रोथोनोटरी ॲण्ड सिनिअर मास्टर यांच्या शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी सन्माननीय न्यायमूर्तींनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या गुणगौरव सोहळयाचे सुत्रसंचालन श्री. रवी पवार, श्री. संतोष पवार व श्रीमती वैशाली पांडे यांनी केले व आभार प्रदर्शन सौ. सीमा देसाई यांनी केले तसेच हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्याकरीता संस्थेचे सभासद व संचालक मंडळ यांनी विशेष प्रयत्न केले

**महिलांकरिता कर्करोगासंदर्भात मार्गदर्शन शिबीर:** उच्च न्यायालय व इतर न्यायालयातीन महिला कर्मचाऱ्यांकरिता कर्करोग, वस्तूस्थिती व जागरूकता या विषयावर मार्गदर्शन, स्लाईड शो, व खुले चर्चासत्र शनिवार दि. ७ जुलै २०१८ रोजी आयोजित करण्यात आले होते. या शिबीराकरीता डॉ. वाय.एस.नंदनवार निवृत्त प्राध्यापक, सायन हॉस्पिटल मुंबई व डॉ. अपर्णा देशपांडे प्राध्यापक जी.एम. मेडिकल कॉलेज आणि के. ई. एम. हॉस्पिटल यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. जवळ जवळ २०० ते २२५ महिलांनी या शिबीराचा लाभ घेतला. सन्माननीय न्यायमूर्ती डॉ. श्रीमती शालिनी फणसाळकर –जोशी मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली या शिबीराचे उद्घाटन झाले. सदर शिबीर यशस्वी करण्याकरिता श्री. किर्लोस्कर साहेब, संस्थेच्या महिला कार्यकर्त्या, संचालक मंडळ व कर्मचारी यांनी उल्लेखनीय प्रयत्न केले.